## श्री. भाई कारखानीस यांचा नवीन उपक्रम :

श्री भाई कारखानीस ऊर्फ दादा कारखानीस यांनी अमेरिका आणि कॅनडामधील स्थाईक असणाऱ्या लेखक लेखीकांचा परिचय ग्रंथ संपादीत करून या वर्षाच्या अखेर प्रसिध्द करण्याचे योजीले आहे. आता पर्यंत जवळ जवळ ४० लेखक-लेखीकांनी या ग्रंथरचनेत भाग घेतला आहे.

या परिचय ग्रंथाचे वैशिष्टय असे की प्रत्येक लेखक लेखीकेच्या परिचया बरोबर त्या त्या लेखकाची एक उत्कृष्ट कथा, लेख, प्रवास वर्णन, कविता अथवा व्यक्तीचित्र समाविष्ट केले जाणार आहे.

गेल्या ५० वर्षांत भारतामधून, विषेशतः महाराष्ट्रातून अनेक मराठी कुटुंबे अमेरिकेत आणि कॅनडामध्ये स्थाईक होण्यासाठी आली. कोणी डॉक्टर्स, कुणी इंजीनियर्स, कुणी संशोधक, कुणी प्राध्यापक तर कुणी आर्किटेक्टस होते. मायदेश सोडून आलेल्या पहिल्या पिढीच्या अनिवासियांनी आपल्या मराठी भाषेची , साहित्याची नाळ तोडलेली नव्हती. किंबहुना आपले व्यवसाय, नोकरीचाकरी सांभाळून मराठी भाषेचे रोप या विदेशाच्या मातीत रूजवण्याचे अटोकाट प्रयत्न केले आणि करीत आहेत. या नंतर येणाऱ्या पिढीला मराठी भाषेची कितपत जाण असेल किंवा आवश्यकता वाटेल याचे भविष्य, काळच ठरवू शकेल. परंतु आजतरी मराठी भाषेची बूज राखणारा लेखकवर्ग आणि वाचकवर्ग अमेरिकेत आणि कॅनडांत निश्चीतच आहे. तसे नसते तर कॅनडामधून प्रसिध्द होणारे ‘एकता’, न्यूयॉर्कचे ‘रंगदीप’, ह्युस्टन मधले ‘सावली’, वॉशिंग्टनमधले ‘हितगूज’, टाम्पा- फ्लॉरिडाचे ‘अभिरुची’ ही त्रैमासिके अथवा वार्षिके,आता पर्यंत तग धरू शकली नसती. तसेच मराठी माध्यमाला वाहिलेली ‘अंतराळ’, ‘मायबोली’ आणि बे एरिया मधली ‘ई प्रसारण’ या वेबसाईटस् मराठी भाषा आणि साहित्य प्रसारीत करण्यांत गेली कित्येक वर्षे सातत्याने कार्यरत आहेत.

या पार्श्वभूमीवर श्री.दादा कारखानीस यांनी आरंभिलेला लेखक परीचयाच्या ग्रंथाचा प्रकल्प अत्यंत उपयुक्त आणि ऐतिहासीक स्वरूपाचा आहे हे निःसंशय. या ग्रंथाच्या संपादन कार्यांत दादा कारखानीसांना बहुमोल मदत करीत आहेत पेन्सील्हिनियाच्या सौ.मोनाली फाटक आणि कॅलिफोर्नियाचे श्री.प्रमोद तेंडूलकर.

“अंतराळ” तर्फे आम्ही श्री. भाई कारखानीसांना सुयश चिंतितो आणि अनेक उत्सुक वाचकांप्रमाणेच या ग्रंथाची कुतुहलाने वाट पाहात आहोत.